सा.प्रगत भारत
वृत्तपत्राचे आजच सभासद व्हा व घरपोच अंक मिळवा वार्षिक ५००/-रू दोन वर्षे-१०००/- रूपये अधिक माहिती वसंपर्क-९८६०८७७७८९
दररोजच्या ताज्या बातम्या पहा.. खालील वेब पोटर्स न्युज ..
www.pragatbhart.com

साप्ताहिक
# प्रगत भारत
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,Em-pragagatbhart@gmail.com,mo.9860877789




• वर्ष:१८ • अंक क्र. ४२ • साप्ताहिक • मंगळवार दि. १२ ते १८ मे २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

## राज्य कामगार विमा योजनेच्या सेवा अधिक सक्षम करा-सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकारे-बोर्डीकर



**मुंबई:राज्यातील कामगारांना अधिक दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य कामगार विमा योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.**

निर्मल भवन येथील एमएसआरडीसी कार्यालयात आयोजित बैठकीत त्यांनी राज्य कामगार विमा योजनेचा आढावा घेतला.बैठकीत योजनेअंतर्गत नोंदणीकृत सदस्यांची संख्या, सदस्यांकडून प्राप्त होणारी वर्गणी, विमा योजनेअंतर्गत कार्यरत असलेले दवाखाने, नवीन दवाखाने सुरू करण्याबाबतची स्थिती तसेच राज्यातील कामगारांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या खाटांची माहिती याबाबत सखोल चर्चा करण्यात आली.सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी कामगारांना आरोग्य सुविधा वेळेत आणि गुणवत्तापूर्ण मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगून, विमा योजनेअंतर्गत सुरू असलेल्या रुग्णालये व दवाखान्यांची कार्यक्षमता वाढविण्याचे निर्देश दिले. औद्योगिक क्षेत्रांमध्ये वाढत्या गरजा लक्षात घेऊन नवीन दवाखाने सुरू करण्याच्या प्रस्तावांवरही यावेळी चर्चा झाली. कामगार विमा योजनेअंतर्गत उप-लब्ध असलेल्या रुग्णखाटा, उपचार सुविधा, वैद्यकीय मनुष्यबळ आणि औषध उपलब्धता याबाबतही यावेळी आढावा घेण्यात आला. कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांना उपचारासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी दिले.बैठकीस संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## पदवी प्रदान समारंभातून विकसित भारताचे भावी शिल्पकार घडत आहेत-ज्योतिरादित्य एम. सिंधिया
## पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचा (डीपीयु) १७ वा पदवीप्रदान समारंभ उत्साहात संपन्न

**पुणे:-पदवीदान समारंभात शैक्षणिक वस्त्र परिधान करून उभ्या असलेल्या विद्यार्थ्यांकडे पाहताना मला विकसित भारत २०४७ चे भावी शिल्पकार दिसत आहेत. विकसित भारत २०४७च्या स्वप्नपूर्तीसाठी युवकांनी परिवर्तनाचे नेतृत्व करत सक्रिय योगदान द्यावे. पदवीदान समारंभ हा शेवट नसून, तो आपल्या आयुष्याच्या नव्या प्रवासाची सुरुवात आहे डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ, पिंपरी,पुणे येथे मिळालेले शिक्षण,संस्कार आणि अनुभव तुम्हाला आत्मविश्वासाने निर्णय घेण्याची,बदलांना सामोरे जाण्याची आणि राष्ट्रनिर्मितीत अर्थपूर्ण योगदान देण्याची ताकद देतील ज्योतिरादित्य एम.सिंधिया केंद्रीय दळणवळण मंत्री आणि ईशान्य क्षेत्र विकास मंत्री, भारत सरकार यांनी येथे सांगितले**

डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ, पिंपरी,पुणे (अभिमत विद्यापीठ) येथे १७ वा पदवीप्रदान समारंभ उत्सा-हात संपन्न झाला. या समारंभासाठी ज्योतिरादित्य एम.सिंधिया,केंद्रीय दळणवळण मंत्री आणि ईशान्य क्षेत्र विकास मंत्री,भारत सरकार हे पाहुणे म्हणूनउपस्थित होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. पी.डी.पाटील कुलपती,डॉ.डी. वाय.पाटील विद्यापीठ,पिंपरी,पुणे यांनी भूषविले.या कार्यक्रमात डॉ. (ब्रिगे.)अमरजित सिंग(निवृत्त) माजी प्रभारी कुलगुरू,डॉ.डी. वाय. पाटील विद्यापीठ,पिंपरी, पुणे आणि माजी अधिष्ठाता,डॉ.डी.वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय,रुग्णालय आणि संशोधन केंद्र,पिंपरी,पुणे तसेच डॉ.ए.एल.काकराणी वैद्यकीय क्षेत्रातील प्रख्यात प्राध्यापक तसेच संचालक-शैक्षणिक सहयोग विभाग डॉ.डी.वाय.पाटील वैद्यकीय महाविद्यालय,रुग्णालय व संशोधन केंद्र,पिंपरी,पुणे.या दोन दिग्गज व्यक्तींना त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल डॉक्टर ऑफ सायन्स ही मानद पदवी देऊन गौरविण्यात आले.

समारंभात विविध विद्याशाखांमधील परीक्षांमध्ये प्रावीण्य संपादन केलेल्या ३० विद्यार्थ्यांना या वेळी सुवर्ण पदके




**डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ, पिंपरी,पुणे (अभिमत विद्यापीठ) येथे १७ वा पदवीप्रदान समारंभासाठी ज्योतिरादित्य एम.सिंधिया,केंद्रीय दळणवळण मंत्री आणि ईशान्य क्षेत्र विकास मंत्री,भारत सरकार हे पाहुणे म्हणून उपस्थित होते यांच्या हस्ते विविध शाखेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.**

देऊन सन्मानित करण्यात येईल.

विविध विद्याशाखेतील १८,७२० स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली असून यामध्ये ४८ विद्या-वाचस्पती (पीएच.डी.)१६,७५२ पदव्युत्तर पदवी,१,९०५ पदवी व १५ पदविका या अशा एकूण ९ विद्याशाखेतील विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

यावेळी डॉ.सौ.भाग्यश्री पी.पाटील (प्र-कुलपती,डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ,पिंपरी,पुणे आणि अध्यक्षा,ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी,पुणे),डॉ.सोमनाथ पी.पाटील (प्र-कुलपती,ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे आणि सचिव,डॉ. डी.वाय.पाटील युनीटेक सोसायटी,पुणे),डॉ. एन.जे. पवार(कुलगुरू डॉ.डी.वाय. पाटील विद्यापीठ,पिंपरी,पुणे),डॉ.सौ. स्मिता जाधव(प्र-कुलगुरू,डॉ. डी.वाय.पाटील विद्यापीठ,पिंपरी, पुणे आणि सचिव,डॉ.डी.वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी,पुणे) तसेचडॉ.यशराज पी.पाटील (विश्वस्त आणि खजिनदार,डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे)यांच्यासह इतर मान्यवर, प्राध्यापक सदस्य,विद्यार्थी आणि पालक यावेळी उपस्थित होते.

योतिरादित्य एम.सिंधिया यांनी मार्गदर्शन पर भाषणात पुढे सांगितले की,आज भारत एका ऐतिहासिक व निर्णायक टप्प्यावर उभा आहे. आरोग्यसेवा,नवोन्मेष,तंत्रज्ञान आणि उद्योजकता या क्षेत्रांमध्ये अफाट संधी उपलब्ध आहेत.मी प्रत्येक विद्यार्थ्याला आवाहन करतो की, केवळ नोकरीचा विचार करू नका,तर आपल्या कार्यातून समाजावर आणि देशावर काय सकारात्मक प्रभाव पडेल याचाही विचार करा.धाडसाने जोखीम घ्या, सातत्याने नवे शिकत राहा,आपल्या संस्थेशी कायम जोडलेले राहा आणि आपल्या या यशस्वी प्रवासामागे असलेल्या पालक व शिक्षकांचे योगदान सदैव स्मरणात ठेवा. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी १४० कोटी भारतीयांचे योगदान आवश्यक आहे. आज भारत जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे आणि २०३० पर्यंत तिसऱ्या क्रमांकावर पोहोचण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. चंद्रावर तिरंगा फडकवणारा भारत आता जगाला दिशा देत आहे.चांद्रयान, आदित्य एल-१ यांसारख्या मोहिमांनी भारताची क्षमता सिद्ध केली आहे.

डॉ.पी.डी.पाटील म्हणाले''पदवीप्रदान समारंभ हा संपूर्ण डॉ.डी.वाय.पाटील विद्यापीठ परिवारासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे.२००३ मधील स्थापने पासून आजवर,हे विद्यापीठ शैक्षणिक गुणवत्ता,नवनवीन प्रयोग,आरोग्य सेवा आणि सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी कटिबद्ध असलेले एक बहुविद्याशाखीय केंद्र म्हणून नावारूपास आले आहे.भारतीय मूल्यांची जोपासना करत जागतिक दर्जाचे शैक्षणिक वा-तावरण निर्माण करण्याच्या ध्येयानेच आमच्या या प्रगतीची वाटचाल झाली आहे.आज पदवी प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. आपल्या व्यावसायिक आयुष्यात पाऊल टाकत असताना,मी तुम्हा सर्वांना असे आवाहन करतो की, तुम्ही तुमची कौशल्ये सातत्याने विकसित करावीत,आपली क्षमता विस्तारत राहावी आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या सेवेसाठी पूर्ण निष्ठेने आणि सार्थ हेतूने करावा.''

adv

## महापालिकेतील निविदा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी एआयचा वापर करा:-मंत्री शेलार




**मुंबई:महापालिकेची निविदा प्रक्रिया मानवी हस्तक्षेप शून्य होऊन ती अधिक पारदर्शक होईल,निविदेतील व्हेरिएशनवर लक्ष राहिल,कामाची अंमलबजावणी प्रभावी होईल, यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करा,असे निर्देश मुंबई उपनगर पालकमंत्री तथा इलेक्ट्रॉनिक,माहिती तंत्रज्ञान,कृत्रिम बुद्धीमत्ता विभाग मंत्री आशिष शेलार यांनी दिले.**

राज्याच्या कृत्रिम बुध्दीमत्ता धोरणाला राज्यमंत्री मंडळाने मंजुरी दिली असून त्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने इलेक्ट्रॉनिक,माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्ता विभागाने काम करण्यास सुरुवात केली आहे.या पार्श्वभूमीवर मंत्री ॲड.शेलार यांनी मुंबई महापालिका आणि इलेक्ट्रॉनिक, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्ता विभागाची संयुक्त बैठक सह्याद्री अतिथीगृहावर घेतली.

या बैठकीला महापालिका आयुक्त अश्विनी भिडे,महाआयटीचे संचालक संजय काटकर,माहिती तंत्रज्ञान विभागाच्या संचालक भुवनेश्वरी यांच्यासह महापालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुंबई महापालिका दैनंदिन कामकाजात एआयचा वापर कशा पद्धतीने होत आहे याबाबतचे सादरीकरण महापालिकेतर्फे करण्यात आले.नालेसफाईमध्ये पारदर्शकता यावी तसेच नागरी सेवांमध्ये पारदर्शक व गतीमानता यावी यासाठी एआयचा वापर करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

नागरिकांच्या तक्रारी चॅटबॉट या एआय तंत्रज्ञानामार्फत विभाग कार्यालयात संकलित करण्यात येत असल्याचे पालिकेने सांगितले.मात्र यामध्ये एआयचा वापर करुन अधिकची सुधारणा करावी व कोणत्याही महापालिका कार्यालयात येणाऱ्या नागरिकांची तक्रार त्याने बोलल्यानंतर तो व्हिडीओ रेकॉर्ड होऊन तो व्हिडीओ संबंधित विभागाकडे जाईल व त्यावर तातडीने कारवाई अथवा कार्यवाही होईल,अशा पध्दतीने नियोजन करण्याचे पालकमंत्री ॲड.शेलार यांनी निर्देश दिले.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्या पद्धतीने मंत्रालयात ई फाईल व ई-स्वाक्षरी ची संकल्पना प्रभावीपणे राबवली आहे,त्याच पद्धतीने मुंबई महापालिकेत ही संकल्पना राबविण्यात यावी आणि पेपरलेस कारभाराच्या दृष्टीने कामकाज होईल याचे नियोजन करावे. निविदा पद्धतीमध्ये पारदर्शकता येणे आवश्यक असून महापालिकेच्या निविदेमध्ये अनेक वेळा व्हेरिएशन केले जाते त्यावर एआय नियंत्रण आणावे, जेणेकरून नागरिकांना अशा पद्धतीने झालेल्या कामांची माहिती मिळू शकेल. तसेच व्हेरिएशनमध्ये करण्यात आलेला निर्णय योग्य आहे की नाही हे एआय मार्फत स्पष्ट होईल,अशा पद्धतीचे नियोजन करण्याच्या सूचना पालकमंत्री ॲड .शे-लार यांनी दिल्या.दरम्यान, महापालिकेच्या कामकाजात नागरिक सहभागीता वाढावी व तरुणांच्या नवनवीन कल्पना समजून त्याचा वापर प्रशासनामध्ये करता यावा, यासाठी तरुणांची हे हँकेथॉन आयोजित करा, असेही मंत्री आशिष शेलार यांनी सूचित केले.

## स्वच्छ सर्वेक्षणासाठी नागरिकांना अभिप्राय नोंदविण्याचं महापौर रवि लांडगे यांचे आवाहन...

**पिंपरी:**स्वच्छ सर्वेक्षण २०२५२६ अंतर्गत पिंपरी चिंचवड शहराला स्वच्छतेत देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले.

नागरिकांचा अभिप्राय हा शहराच्या विकासाचा महत्त्वाचा आधार असल्याचे त्यांनी सांगितले.महापौर रवि लांडगे म्हणाले,''शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपला अभिप्राय नोंदवणे आवश्यक आहे.''यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर आणि आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनीही नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले.नागरिकांना स्वच्छ सर्वेक्षण अभिप्राय पोर्टल वर जाऊन अभिप्राय नोंदवता येणार आहे.






# श्री नागेश्वर विद्यालय मोशी भागशाल चिखली शाळेला गुणवत्ता संवर्धन मूल्यांकन सन्मान प्राप्त

**भोसरी:**पुणे जिल्हा परिषद, माध्यमिकशिक्षण विभाग व पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित गुणवत्ता संवर्धन मूल्यांकन २०२५-२६ अभियानांतर्गत इयत्ता पाचवी ते बारावी पिंपरी चिंचवड भोसरी 'अ' गटातून पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,श्री नागेश्वर विद्यालय मोशी, भागशाळा चिखली माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेने तृतीय क्रमांक पटकावून घवघवीत यश संपादन केले.

गणेश कला क्रीडा रंगमंच पुणे येथे गुरुवारी (दि.२३एप्रिल) जिल्हास्तरीय पारितोषिक वितरण समारंभामध्ये मा. शिक्षणाधिकारी डॉ.भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते झाले. श्री नागेश्वर विद्यालय मोशी भागशाळा चिखली माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक सानप सर,उपमुख्याध्यापिका श्रीम नाणेकर मॅडम,पर्यवेक्षिकासौ. ठोंबरे मॅडम,पर्यवेक्षिका सौ. पंडित मॅडम शाळेतील सहकारी अध्यापक,अध्यापिका,शिक्षकेतर कर्मचारी यांनी पुरस्कार स्वीकारला. या कार्यक्रमाला राज्याचे शिक्षण संचालक महेश पालकर,पुणे विभागाचे शिक्षण उपसंचालक डॉ.गणपत मोरे,राज्य मुख्याध्यापक महामंडळाचे सचिव नंदकुमार सागर,पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड,सचिव शिवाजीराव कामथे,कार्याध्यक्ष राजेश गायकवाड,उपाध्यक्ष सुधाकर जगदाळे, प्राचार्य शिवाजी शिंदे,किशोर बोरसे, सुरेश कांचन,बाळासाहेब चव्हाण,विश्वस्त अरुण थोरात,शिवाजीराव किलकिले, विविध शिक्षण संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.








# डॉ.डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.डॉ.आबाजी माने यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाची 'पीएच.डी.'प्रदान

**पिंपरी:**-येथील डॉ.डी. वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे शारीरिक शिक्षण संचालक प्रा.आबाजी माने यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या (BAMU) वतीने शारीरिक शिक्षण या विषयात मानाची विद्यावाचस्पती (Ph.D) पदवी प्रदान करण्यात आली आहे. दिनांक ११ मे २०२६ रोजी विद्यापीठाच्या वतीने त्यांना अधिकृतपणे या पदवीने सन्मानित करण्यात आले.



प्रा.डॉ.आबाजी माने यांनी शारीरिक शिक्षण क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाच्या आणि अभ्यासपूर्ण विषयावर आपले संशोधन पूर्ण केले आहे. त्यांनी "विशिष्ट भार प्रशिक्षण कार्यक्रमाचा वेटलिफ्टिंग खेळाडूंच्या शारीरिक सुदृढता व कौशल्य कार्यमान घटकांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास" या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता. त्यांच्या या संशोधनाचा फायदा आगामी काळात वेटलिफ्टिंग क्षेत्रातील खेळाडूंची शारीरिक सुदृढता आणि कौशल्य वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होणार आहे.क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव प्रा.डॉ.माने यांना पीएच.डी.पदवी जाहीर झाल्याचे समजताच आकुर्डी येथील डी.वाय. पाटील शैक्षणिक संकुलासह संपूर्ण शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. महाविद्यालयाचे पदाधिकारी, प्राचार्य,प्राध्यापक वर्ग आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे. आपल्या या यशाबद्दल बोलताना डॉ.माने यांनी,हे यश त्यांचे मार्गदर्शक, कुटुंबिय आणि डी.वाय.पाटील कॉलेज प्रशासनाच्या खंबीर पाठिंब्यामुळेच शक्य झाल्याची भावना व्यक्त केली.खेळाडूंच्या क्रीडा कौशल्यात वैज्ञानिक दृष्टिकोनातून सुधारणा करण्यासाठी आपले हे संशोधन उपयुक्त ठरेल,असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# विधान परिषद निवडणूक बिनविरोध जाहीर;९ उमेदवारांना विधिमंडळ सचिवालयाकडून प्रमाणपत्र प्रदान

**मुंबई:**विधान परिषदेच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर रिंगणातील सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले.या उमेदवारांना निवडून आल्याचे प्रमाणपत्रही विधिमंडळ सचिवांकडून देण्यात आले. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी एकूण प्रमुख राजकीय पक्षाच्या उमेदवारांसह चार जणांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले होते. मात्र, या अपक्ष उमेदवारांचे अर्ज २ मे रोजीच्या छाननीत बाद झाले.त्यामुळे ९ जागांसाठी ९ उमेदवार रिंगणात राहिले.

त्यामुळे अर्ज माघारीची मुदत संपल्या नंतर ९ उमेदवारांना निवडून आल्याचे घोषित करण्यात आले.त्याचप्रमाणे विधान परिषदेच्या एका जागेसाठीच्या पोट निवडणुकीत भाजपच्या प्रज्ञा सातव यांचा एकमेव अर्ज

विजयी उमेदवार भाजप




होता.त्यामुळे सातव या नाही विजयी घोषित करण्यात आले. दरम्यान,विधान परिषदेवर निवडून आल्यानंतर अंबादास दानवे यांनी 'मातोश्री' वर जाऊन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी खासदार अनिल देसाई, आमदार मिलिंद नार्वेकर आदी उपस्थित होते.

**विजयी उमेदवार भाजप**:सुनील कर्जतकर,माधवी नाईक,संजय भेंडे,विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार **शिवसेना शिंदे गट**:डॉ. नीलम गोऱ्हे,बच्चू कडू **राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट** विजयी उमेदवार:झिशान सिद्दिकी **शिवसेना ठाकरे गट विजयी उमेदवार** :अंबादास दानवे

शिवसेना शिंदेगट विजयीउमेदवार




**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट विजयी उमेदवार:**झिशान सिद्दिकी





**शिवसेना ठाकरे गट (उध्दव बाळासाहेब ठाकरे): अंबादास दानवे**

# माहिती अधिकार हे भ्रष्टाचारा विरोधातील प्रभावी शस्त्र ॲड.अजित बोराडे यांचे प्रतिपादन

## माहिती कायद्याचा चुकीचा वापर करून प्रामाणिक कार्यकर्त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतात-खासदार श्रीरंग बारणे

### दक्ष नागरिक संघाचा माहिती अधिकार मेळावा व पुरस्का प्रदान कार्यक्रम संपन्न

**पिंपरी:सरकारी कार्यालयांत सामान्य नागरिकांना मिळणारी वा-गणूक पाहता ही खरोखर जनतेची सत्ता आहे का,असा प्रश्न निर्माण होतो.ही व्यवस्था बदलण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी'माहिती अधिकार कायदा २००५' हे सर्वसामान्यांच्या हातातील प्रभावी शस्त्र असल्याचे प्रतिपादन सहकारतज्ज्ञ ॲड.अजित बोराडे यांनी केले.**

दक्ष नागरिक संघाच्या वतीने चिंचवड येथे रविवारी (दि.१०) आयोजित माहिती अधिकार कार्यकर्त्यांचा महामेळावा व पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते मेळाव्याचे उदघाटन झाले. कार्यक्रमास कामगार नेते इरफान सय्यद,नगरसेविका सुप्रिया चांदगुडे,पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे,नगरसेवक राजू बनसोडे,युवा सेनेचे निलेश हाके,ॲड.श्वेता मांडे-वैद्य, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर नागरगोजे,शांताराम कुंभार,पत्रकार सुरज साळवे,काशिनाथ शिंदे आदी उपस्थित होते.

या वेळी खासदार बारणे यांच्या हस्ते संजीवन सांगळे यांना 'सहकार भूषण',डॉ.सोनाली गेडाम-नागदेवते यांना 'विद्यारत्न', तर पत्रकार सुरज साळवे यांना 'पत्रकारिता भूषण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

ॲड.बोराडे म्हणाले,स्वातंत्र्यानंतरही प्रशासकीय यंत्रणेचा दृष्टिकोन फारसा बदललेला नाही.सुशिक्षित व्यक्तींनाही एखाद्या कामासाठी अनेक महिने कार्यालयांच्या चकरा माराव्या लागतात,तर अशिक्षित नागरिकांची अवस्था अधिक कठीण असते.माहिती अधिकार कायद्यामुळे शासकीय अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व वाढते आणि त्यांच्या चुकीच्या निर्णयांवर प्रकाश पडतो. माहिती अधिकार कायद्यांतर्गत केवळ कागदपत्रेच नव्हे,तर सरकारी कामातील साहित्य,रस्ते बांधणीसाठी वापरण्यात येणारे सिमेंट,वाळू किंवा औषधांचे नमुने घेण्याचाही अधिकार नागरिकांना आहे. तसेच संबंधित कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष फाईल तपासणी करण्याची तरतूदही या कायद्यात असून,पहिल्या तासासाठी ही तपासणी मोफत असल्याची माहिती त्यांनी दिली.





**चिंचवड- येथे खासदार बारणे यांच्या हस्ते पिं.चिं.हा.सो. फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांना 'सहकार भूषण'पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी सहकारतज्ज्ञ ॲड.अजित बोराडे,कामगार नेते इरफान सय्यद,नगरसेविका सुप्रिया चांदगुडे,आदी उपस्थित होते**

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले,माहिती अधिकार कायद्यामुळे सर्वसामान्य नागरिक सत्तेच्या केंद्रस्थानी आला आहे. कायद्याचे तांत्रिक ज्ञान नसतानाही केवळ एका अर्जाद्वारे प्रशासकीय कामातील त्रुटी आणि चुका उघड करणे शक्य झाले आहे. चुकीच्या पद्धतीने काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना वठणीवर आणण्याचे काम या कायद्याने केले आहे. माहिती अधिकाराचा वापर विधायक कामांसाठी झाल्यास अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होते.माहिती अधिकार कायद्यामुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढली असून नागरिकांना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींना आळा बसला आहे. मात्र काही जण या कायद्याचा चुकीचा वापर करून प्रामाणिक कार्यकर्त्यांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांनी आपल्या कामातील आणि चारित्र्यातील स्वच्छता जपणे आवश्यक असल्याचेही बारणे यांनी नमूद केले. सूत्रसंचालन ॲड.श्वेता मांडे-वैद्य यांनी केले. विनोद क्षीरसागर यांनी प्रस्ताविक,तर निलेश हाके यांनी आभार मानले.

adv

# पाणीटंचाईच्या प्रश्नावर नगरसेविका श्रुती वाकडकर आक्रमक;सर्वसाधारण सभेत प्रशासनाला धरले धारेवर

## 'पवना बंद पाइपलाईन योजना' तातडीने पूर्ण करण्याची मागणी

**पिंपरी:-पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती पाणीटंचाई, कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा आणि अशुद्ध पाण्याच्या समस्येवरून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत नगरसेविका श्रुती राम वाकडकर यांनी प्रशासनाला धारेवर धरले. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत बंद पडलेली 'पवना बंद पाइपलाइन योजना' तातडीने पूर्ण करण्याची मागणी श्रुती वाकडकर यांनी केली.**

सभेत बोलताना श्रुती वाकडकर म्हणाल्या की,प्रभाग क्रमांक २५ मधील वाकड, पुनावळे,ताथवडेसह शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असून काही ठिकाणी अशुद्ध पाणीही मिळत आहे. नियमित कर भरूनही नागरिकांना स्वच्छ व पुरेसे पाणी मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे त्यांनी नमूद केले.

पाण्याचा पाणीपुरवठ्याच्या समस्येमुळे अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना दर महिन्याला लाखो रुपये खर्च करून टँकरद्वारे पाणी खरेदी करावे लागत असल्याची बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.त्यामुळे सामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता 'पवना धरण बंद पाइपलाइन योजना' तातडीने कार्यान्वित करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. ही योजना पूर्ण



झाल्यास पाणीगळती रोखण्यास मदत होईल तसेच नागरिकांना नियमित,शुद्ध आणि पुरेसा पाणीपुरवठा करता येईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी त्यांनी प्रशासनाला अनेक थेट प्रश्न विचारले.कर भरूनही नियमित पाणीपुरवठा का होत नाही?कमी दाबाने आणि अशुद्ध पाणीपुरवठा होण्यामागील कारणे काय? नागरिकांना टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ का येत आहे? तसेच 'पवना बंद पाइपलाइन योजना' अद्याप प्रलंबित का आहे, याबाबत त्यांनी स्पष्टीकरण मागितले.


